# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १४८–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. महादेव निलाप्पा हावगोंडी,<br>मु. पो. शेड्याळ, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :–
१) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. महादेव निलाप्पा हावगोंडी, मु. पो. शेड्याळ, ता. जत, जि. सांगली यांनी आपली शेत जमीन गट क्र. २२६/२ मध्ये ३ अश्वशक्तीसाठी विद्युत पुरवठा मिळावा यासाठी पावती क्र. १८१६१८० दि. २०.८.१९९९ नुसार रु. २७२०/– वितरण कंपनीकडे चलनाने भरले आहेत. वि.प.चे लेखी पत्र क्र. ९५१ दि. ९.९.२००४ नुसार दि. २७.९.२००४ रोजी चाचणी अहवाल दिला आहे. त्यांना विद्युत पुरवठा मिळाला नाही, त्यामुळे त्यांनी दि. १८.११.२००९ रोजी दुसरा चाचणी अहवाल दिला. यापूर्वी ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे तक्रार क्र. ७३९ दि. ३०.१२.२००८ ला दाखल केली.

त्यामध्ये दिनांक ३०.१२.२००८ ला आदेशाचे पालन झाले नाही म्हणून दुसरा तक्रार अर्ज क्र. ५८ दि. २७.४.२०१० रोजी दिला. त्यानुसार अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ६३१९ दि. २९.५.२०१० रोजी पारित करुन कृती मानके साध्य करण्यात अपयश आले ग्राहक भरपाई द्यावी असे आदेश दिले. मंचाकडून वीज जोडणी मिळावी व विलंबाबाबत ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी केली. तसेच तक्रारदार स्वत: मंचासमोर हजर झालेस व मागणी केलेसच पुढील कार्यवाही करण्यात यावी, तक्रारदारांच्या अनुपस्थितीत त्रयस्थ व्यक्तीकडून तक्रारदारांच्या वतीने कांही कागदपत्रें सादर करण्यात आली तर ती ग्राह्य धरु नये अशी मंचास विनंती केली आहे.

अंतर्गत कक्षाने आपल्या दि. २७.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी दि. २०.८.१९९९ रोजी अनामत रक्कम भरली असल्याचे व चाचणी अहवाल दि. १८.११.२००९ ला दिल्याचे मान्य केले आहे. त्यांचे ०.३ कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम पूर्ण करुन त्यांना दि. २०.७.२०१० रोजी वीज पुरवठा करण्यात आला आहे.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २८.७.२०१० रोजी सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार गैरहजर. तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे यांनी मंचासमोर दि. १८.११.२००९ पासून ३ महिन्यानंतर म्हणजे दि. १७.२.२०१० पासून पुढे वीज जोडणी देईपर्यंतच्या कालावधीसाठी भरपाई मिळणे आवश्यक आहे, कारण कृती मानके विनियमातील तरतुदींचा भंग झाला आहे. या उलट, उत्तरादाखल वि.प.तर्फे दि. २०.७.२०१० रोजी कनेक्शन देण्यात आले असल्याचे सांगितले. वि.प.तर्फे असे प्रतिपादन करण्यात आले की, वीज जोडणी दिली असल्याने भरपाईची रक्कम माफ करण्यात यावी अशी मंचास विनंती केली आहे त्यांस प्रतिनिधींची संमत्ती आहे. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार भरपाई मिळण्यास हक्कदार आहे काय ?

उत्तर : होय

आदेश ?

वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी विनंती केल्याप्रमाणे तक्रारदाराचे प्रतिनिधींनी विलंबापोटी भरपाई माफी करण्यास मंचासमोर तोंडी सहमती दाखविली असल्याने तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

कारणमिमांसा

प्रस्तुतची तक्रार मंचाकडे तक्रारदाराचे सहीने टाईप्ड मजकुरात दाखल केली आहे, प्रतिनिंधींचे अधिकारपत्र नाही. अर्जामध्ये मंचास केलेली मागणी क्र २ मध्ये तक्रारदार स्वत: मंचासमोर हजर झालेस व मागणी केलेस पुढील कार्यवाही करावी हा मजकूर टाईप्ड आहे व माझ्या अनुपस्थितीत त्रयस्थ व्यक्तीने कांही कागदपत्रें हजर केलीच तर ती ग्राह्य धरु नयेत हा मजकूर हस्ताक्षरात लिहीलेला आहे. याचाच अर्थ तक्रारदार यांनी दुसऱ्याच्या मदतीने ही तक्रार केली आहे. अशी मदत करणाऱ्याने तक्रार मागे घेण्याची भिती असल्याने हस्ताक्षरामध्ये तक्रारदाराच्या अर्जावर त्रयस्थ व्यक्तीने कांही कागदपत्रें हजर केलीच तर ती ग्राह्य धरु नयेत हा मजकूर हस्ताक्षरात लिहीलेला आहे.

तक्रारदार यांनी दि. २०.८.१९९९ वि.प.कडे अर्ज केला आहे. तक्रारदार यांनी ३ अश्वशक्ती शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा मिळावा यासाठी दि. १८.११.२००९ रोजी चलन भरले आहे. त्यानंतर दि.१७.२.२०१० पर्यंत त्यांना वीज जोडणी मिळणे आवश्यक होते.

त्यानंतरच्या वीज जोडणी मिळेपर्यंतच्या कालावधीसाठी तक्रारदार भरपाई मिळण्यास हक्कदार आहेत व वि.प.ची ती जबाबदारी आहे.  विलंबाबाबत वि.प.ने कु ठलेही स्पष्टीकरण दिले नाही, त्यामुळे २० आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. २०००/– भरपाई तक्रारदारास वि.प.कडून मिळणे अपेक्षित आहे व होते. परंतु श्री. खापरे यांनी मंचासमोर प्रतिनिधी म्हणून तक्रारी मांडल्या व प्रस्तुत प्रकरणामध्ये वि.प.स भरपाई माफ करण्यास सहमती दर्शविली हे मंचासमोर दि. २८.७.२०१० रोजी स्पष्ट झाले, त्यामुळे तक्रार निकाली काढणे योग्य होईल. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) तक्रारदार यांस दि. २०.७.२०१० रोजी वीज जोडणी मिळाल्याने २० आठवड्यांच्या विलंबापोटी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. २०००/– भरपाई वि.प.च्या मागणीनुसार माफ करण्यास प्रतिनिधींनी संमत्ती दिल्याने नाकारण्यात आलेली आहे.  तक्रार निकाली काढण्यात आली आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे  करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष